## संक्षिप्त

### राज्यात १२७ लाख क्विंटल कापूस खरेदी : पणन मंत्री रावल

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



राज्य व केंद्र सरकारने खरेदी प्रक्रियेत गती आणल्यामुळे चालू हंगामात आतापर्यंत शेतकऱ्यांकडून १२७.०७ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला. त्याची किंमत १० हजार ०९७.९९ कोटी रुपये इतकी असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे. काँग्रेसचे विधान परिषद सदस्य भाई जगताप यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात त्यांनी ही माहिती दिली आहे. भारतीय कपास निगम लिमिटेडने यंदा कापूस खरेदीसाठी 'कपास किसान' हे विशेष मोबाईल ॲप कार्यान्वित केले आहे. राज्यातील ७ लाख २० हजार शेतकऱ्यांनी यावर नोंदणी केली आहे. आधार क्रमांक आणि जमिन नोंदींच्या आधारे कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत पडताळणी करूनच ही खरेदी करण्यात आली आहे.

### जि. प. निवडणुकीत दानवेंनी शिंदे गटासोबत १८ कोटींचा सौदा केला

**वैजापूर : पुढारी वृत्तसेवा**



छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर शिवसेना ठाकरे गटातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी आमचा शिंदे गटासोबत १८ कोटी रुपयांमध्ये सौदा केला होता, असा गंभीर आरोप ठाकरे गटाचे जिल्हा परिषद सदस्य संजय निकम यांनी केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवडणूक पार पडण्यापूर्वी अंबादास दानवे यांनी पक्षातील काही सदस्यांवरच संशय व्यक्त करत गंभीर आरोप केले होते. आता जिल्हा परिषद सदस्य संजय निकम यांनी ते आरोप फेटाळून लावत उलट दानवे यांच्यावरच गंभीर स्वरूपाचा आरोप केला आहे. यामुळे आता या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, या आरोपांवर दानवे यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. मात्र या प्रकरणामुळे ठाकरे गटात अंतर्गत मतभेद तीव्र झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# बारामती एकतर्फी, तर राहुरीच्या पोटनिवडणुकीत रंगणार लढत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे अनुक्रमे बारामती आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची निवडणूक एकतर्फी होणार अशी चर्चा असली तरी राहुरीमधील लढत मात्र रंगतदार होण्याची शक्यता आहे.

राहुरीमध्ये मात्र चित्र वेगळे आहे. कर्डिले यांच्या निधनामुळे निर्माण झालेली सहानुभूती विरुद्ध राजकीय खेळी असे चित्र आहे. या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली जाईल, असे बोलले जाते. परंतु अहिल्यानगर लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले भाजप उमेदवार माजी खासदार सुजय विखे पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याही नावाची चर्चा सुरू आहे.

अलीकडच्या काळामध्ये माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेली हिंदुत्ववादी भूमिका, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी जवळीक वाढल्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा होत आहे. शिवाजीराव कर्डिले यांचे चिरंजीव आणि युवा चेहरा अशी अक्षय कर्डिले यांची ओळख आहे. परंतु प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या तुलनेने त्यांचा मर्यादित जनसंपर्क आहे. यामुळे ही निवडणूक त्यांच्यासाठी आव्हानात्मक असल्याचे बोलले जाते. भाजपचे संभाव्य उमेदवार अक्षय कर्डिले विरुद्ध महाविकास आघाडीचे संभाव्य उमेदवार प्राजक्त तनपुरे यांच्यात लढत झाल्यास अहिल्यानगरमधील अंतर्गत राजकारणाचा तनपुरे यांना फायदा होऊ शकेल, अशी चर्चा आहे. प्राजक्त तनपुरे यांनी भाजपमध्ये प्रवेश करून उमेदवारी मिळवली तर महाविकास आघाडीकडे सक्षम उमेदवार नसेल.

# आता अपवादात्मक स्थितीतच मिळणार सुनावणीला स्थगिती!

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

खटल्यांच्या सुनावणीला विलंब होऊ नये यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कडक पावले उचलली असून अपवादात्मक परिस्थितीत आणि विशिष्ट नियमांच्या अधीन राहूनच सुनावणी स्थगित करण्याची विनंती विचारात घेतली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने परिपत्रक जारी केले आहे.

सुनावणी स्थगितीसाठीचे पत्र 'ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड' किंवा स्वतः पक्षकारांकडून दिले जाऊ शकते. हे विनंती पत्र दुसऱ्या पक्षाला किंवा कॅव्हेटरला देणे अनिवार्य आहे. सुनावणीच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ वाजण्यापूर्वी अशा विनंतीची प्रत सादर करणे आवश्यक आहे. विरुद्ध पक्ष अशा विनंतीवर आक्षेप घेऊ शकतो. हे आक्षेप आदल्या दिवशी दुपारी १२ वाजण्याच्या आधी ई-मेलद्वारे पाठवणे आवश्यक असून ते न्यायालयासमोर ठेवले जातील.

### प्रलंबित प्रकरणे

● मार्च २०२६ आकडेवारीनुसार, सर्वोच्च न्यायालयात सध्या ९२,८८२ प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये ७३,२०९ दिवाणी आणि १९,६७३ फौजदारी प्रकरणांचा समावेश आहे. प्रलंबित प्रकरणांचा हा मोठा डोंगर पाहता न्यायालयाने हे कडक नियम लागू केले आहेत.

कुटुंबातील मृत्यू, वकिलाचे किंवा पक्षकाराचे आजारपण किंवा न्यायालयाचे समाधान होईल असे इतर कोणतेही अत्यंत महत्त्वाचे कारण असल्यासच यापुढे खटल्यांना स्थगिती दिली जाणार आहे. नवीन प्रकरणांमध्ये केवळ एकदाच स्थगितीसाठी विनंती करता येईल. तसेच, न्यायालयासमोर प्रकरण आल्याशिवाय सलग दोन वेळा स्थगिती दिली जाणार नाही, असे परिपत्रकात म्हटले आहे.

# डोंबिवलीच्या नेहरू मैदानात महाकाय दीडशे फुटांची गुढी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



डोंबिवलीतील नववर्ष स्वागतयात्रेचे यंदाचे २८ वे वर्ष होते. या वर्षीचे एक खास आकर्षण ठरले ते म्हणजे नेहरू मैदानात उभारलेली दीडशे फुटांची गुढी. विशाल हिंदुत्व आणि सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

ही संकल्पना डोंबिवलीतील श्री गणेश मंदिर संस्थानाच्या माध्यमातून सुरु झाली. या संकल्पनेचे श्रेय आबासाहेब पटवारी आणि सुधीर जोगळेकर या संघ परिवारातील डोंबिवलीकरांना असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. वंदे मातरम या राष्ट्रगानाचे शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी (१५०वे) वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी (१००वे) वर्ष यावर आधारित डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराने २ चित्ररथ यंदाच्या शोभायात्रेत साकारले होते. यंदाच्या वर्षी देशभक्तीची अनेक रूपं अशा आशयाची संकल्पना शोभायात्रेच्या माध्यमातून राबवली.


**जाहीर सूचना**

आम्ही **मे. आरएनपी वेअरहाऊसिंग आणि लॉजिस्टिक प्रायवेट लिमिटेड** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की **महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने** आमच्या **सर्वे क्र. ११/१/यु, १२/१/ए/१, १२/१/ए/२, १२/२, १२/३/ए/१पार्ट, १२/३/ए/२, १३/१/ए, १३/१/ए/७, १४/ए/२, १६/१, ४८/१२, वालशिंद गाव, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र** येथिल वेअर हाऊस प्रकल्पाला दिनांक **१४ मार्च २०२६** रोजी पत्र क्रमांक **EC25C3805MH5979725N** अन्वये पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून विस्तारित मान्यता दिली आहे.

सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तारीख : **२० मार्च २०२६**

स्थळ : **नवी मुंबई**

सही/-

**मे. आरएनपी वेअरहाऊसिंग आणि लॉजिस्टिक प्रायवेट लिमिटेड**



**बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

खेतीया शाखा : गायत्री मंदिराजवळ, पानसेमल रोड, खेतीया-४५१८८१ (म.प्र.)

ई-मेल : khetia@bankofbaroda.com

सविस्तर अटी व शर्तींसाठी येथे स्कॅन करा.

परिशिष्ट-IV-A नियम ८(६) आणि ६(२) च्या तरतुदी पहा

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

वित्तीय मालमत्तांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित अंमलबजावणी कायदा, २००२ च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) आणि ६ (२) च्या तरतुदीसह वाचले असता.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, तारणदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडिटर (सुरक्षित धनको) कडे गहाण/प्रभारीत आहे, ज्याचा ताबा बँक ऑफ बड़ौदाच्या (सिक्युअर्ड क्रेडिटर) अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती मालमत्ता खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसुलीसाठी ''जे आहे जिथे आहे'' , ''जे आहे जसे आहे'', आणि ''जे काही आहे'' या तत्त्वावर विकली जाईल.

कर्जदार/तारणदार/जामीनदार/सुरक्षित मालमत्ता/थकबाकी/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, इसारा रक्कम आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| कर्जदार/जामीनदार/तारणदार यांचे नाव आणि पत्ता | स्थावर मालमत्तेचे थोडक्यात वर्णन आणि ज्ञात भार (असल्यास) | एकूण थकबाकी | ई-लिलावाची तारीख आणि वेळ | राखीव किंमत | ईएमडी | बोली वाढीची रक्कम | कब्जाची स्थिती (सांकेतिक/ भौतिक) | मालमत्ता निरीक्षणाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदार: **१. मेसर्स गोकुळ गिनिंग फॅक्टरी** (भागीदारांमार्फत) पत्ता: सर्व्हे नं. ४८७/४, पी.एच. नं. १९ (नवीन पी.एच. नं. ०३) पानसेमल रोड खेतीया, तहसील-पानसेमल, जिल्हा-बडवानी (म.प्र.) - ४५१८८१<br>**२. श्री प्रवीण शाह पिता स्व. जीवनलाल शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: हनुमान चौक खेतीया, जिल्हा बडवानी, म.प्र. ४५१८८१<br>**३. श्रीमती निरुपमा शाह पती प्रवीण शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: हनुमान चौक खेतीया, जिल्हा बडवानी, म.प्र. ४५१८८१<br>**४. श्रीमती शर्मिल शाह पती हरीश शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: B५०२ मंत्री क्लासिक, मुख्य 8th क्रॉस, 4th ब्लॉक, STBed लेआउट, कोरामंगला, बंगलोर-५६००३४<br>**५. श्री अभिषेक शाह पिता चेतन शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: B-४८/४०२, छत्रपती शिवाजी रोड, आनंद नगर, दहिसर (पूर्व), मुंबई<br>**जामीनदार:**<br>**१. श्रीमती राधिकाबेन पती स्व. जीवनलाल शाह** (जामीनदार) पत्ता: हनुमान चौक, खेतीया, तहसील-पानसेमल, जिल्हा-बडवानी म.प्र. ४५१८८१<br>**२. श्री हरीश शाह पिता स्व. जीवनलाल शाह** (जामीनदार) पत्ता: B५०२ मंत्री क्लासिक, 1st मुख्य 8th क्रॉस, 4th ब्लॉक, ST Bed लेआउट, कोरामंगला, बंगलोर-५६००३४<br>**३. श्री चेतन शाह पिता स्व. जीवनलाल शाह** (जामीनदार) पत्ता: B-४८/४०२, छत्रपती शिवाजी रोड, आनंद नगर, दहिसर (ई) मुंबई<br>**४. श्रीमती वीणाबेन पती सुरेश श्रॉफ** (जामीनदार) पत्ता: अशोक नील सोसायटी सेक्टर नं. ०८, C/३१, ४था मजला, फ्लॅट नं. ४०३, मीरा रोड, पूर्व मुंबई ४००७१० | (१) **मेसर्स गोकुळ गिनिंग फॅक्टरीच्या** नावावर असलेली, सर्व्हे नं. ४८७/४, पी.एच. नं. १९ (नवीन पी.एच. नं. ०३) पानसेमल रोड, खेतीया, तह. पानसेमल जिल्हा: बडवानी (म.प्र.) येथे स्थित १.५१८ हेक्टर (१५१८० चौ.मी.) क्षेत्रफळाची लीज होल्ड डायव्हर्टेड फॅक्टरी जमीन आणि इमारतीचे समन्यायी गहाण. **सीमा:** पूर्व: नाला, पश्चिम: संचेती कोटेक्स, उत्तर: खेतीया-पानसेमल रोड, दक्षिण: मनोहर निकुम. | ₹ १२,२९,२३,५१९.१५/- (अक्षरी रुपये बारा कोटी एकोणतीस लाख तेवीस हजार पाचशे एकोणीस आणि पंधरा पैसे फक्त) + इतर शुल्क आणि खर्च + ०१.०६.२०२५ पासूनचे पुढील व्याज. | ई-लिलावाची तारीख १०/०४/२०२६ ई-लिलावाची वेळ दुपारी २ ते संध्याकाळी ६ पर्यंत. | ₹ ५,२६,८०,०००/- | ₹ ५२,६८,०००/- | ₹ ५०,०००/- | भौतिक कब्जा | ०८/०४/२०२६ रोजी दुपारी १२:०० ते संध्याकाळी ०४:०० वाजेपर्यंत |
| | (२) श्री प्रवीण पिता श्री जीवनलाल शाह यांच्या नावावर असलेले, घर क्र. ३९, नगर पालिका, वॉर्ड क्र. ८, जवाहर मार्ग, खेतीया, तहसील पानसेमल, जिल्हा बडवानी (म.प्र.) येथे स्थित ७५० चौ. फूट क्षेत्रफळाच्या घराचे समन्यायी गहाण. **सीमा:** पूर्व: सुमित्राबाईंची उर्वरित जमीन, पश्चिम: प्रवीण कुमार पिता स्व. जीवनलाल शाह, उत्तर: रस्ता, दक्षिण: पुढील रस्ता. | | | ₹ ११,८०,०००/- | ₹ १,१८,०००/- | ₹ १०,०००/- | भौतिक कब्जा | |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया बँक ऑफ बड़ौदाच्या https://www.bankofbaroda.in/e-auction या लिंकला आणि Baanknet.com या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी **मोबाईल क्रमांक: ९७५२४१०७०५** वर संपर्क साधू शकतात.

**तारीख: १८.०३.२०२६ ठिकाण: खेतीया** **अधिकृत अधिकारी, बँक ऑफ बड़ौदा**



